# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०५/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

**जबरी चोरीच्या गुन्ह्यात फिर्यादीच निघाला चोर**

दि. ०४/०८/२०२२ रोजी फिर्यादी नामे– राकेश वसंतराव झिलपे, वय ३७ वर्ष, रा. गुजरखेडी, सावनेर ता. सावनेर जिल्हा नागपूर यांनी तोंडी रिपोर्ट दिला की, तो नेहमी प्रमाणे वेगवेगळया आस्थापना मधून एकुण **६,२९,६००/–रूपये** गोळा करून हॅन्ड बॅग मध्ये टाकून आपल्या मोपेड गाडी क्र. MH-40/BU-6877 ने गुमथाळा कडून गुमथी मार्गे सावनेर कडे जात असता गुमथी शिवारातील मुख्य डांबरी रोडवर यातील फिर्यादीस नंबर नसलेल्या काळया रंगाच्या पल्सवर अंदाजे २० ते २५ वर्ष, वयोगटातील दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस अटकावून चाकूचा धाक दाखवून 'तु मुझे बॅग दे, नही तो मै चाकू खुपसता हूॅं'। असे म्हणून त्याचे जवळ पैसे असलेली बॅग, बळजबरीने हिसकावून घेवून त्याचा मोबाईल जमिनीवर आपटून मोपेड गाडीची चाबी झूडूपात फेकून आलेल्या मार्गे नागपूर कडे निघून गेले. फिर्यादीच्या अशा तक्रारीवरून पो.स्टे खापरखेडा अप.क्र. ४३३/२०२२ कलम ३९२,३४१,५०६,३४, भादवि सहकलम ४/२५ भा.ह.का. वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना गुन्हयातील फिर्यादी यास विश्वासात घेवून पोस्टे खापरखेडा येथे गुन्हया बाबत सविस्त विचारपूस केली असता सदरचा गुन्हा हा स्वतां व मित्र प्रशांत रामराव वरठी रा. रेल्वेस्टेशन च्या मांगे जैस्वाल ले आउट सावनेर याचे मदतीने केल्याचे कबुल केल्याचे सांगीतले व सदरची रक्कम हि प्रशांत रामराव वरठी रा. रेल्वेस्टेशन च्या मांगे जैस्वाल ले आउट सावनेर याचे राहते घरी ठेवल्याचे सांगीतले. करीता त्यास ताब्यात घेउन शासकीय वाहणाने प्रशांत वरठी रा सावनेर याचे राहते घरी गेलो असता तीथे प्रशांत वरठी याची पत्नी घरी हजर मिळाली. करीता फिर्यादी समक्ष तीला विश्वासात घेउन विचारपुस केली असता तीने पती प्रशांत ला फोन करुन विचारले असता त्यांनी सांगीतले की बेडरुममधील ड्रेसींग टेबल च्या मांगे जांभळया रंगाचे बैग मध्ये रक्कम ठेवल्याचे सांगीतले. करीता तीने स्टॉप समक्ष जाउन ड्रेसींगच्या मांगे ठेवलेली बैग काढुण दिल्याणे पंचासमक्ष बैगची पाहणी केली असता बैगमध्ये २०००/–रु.,५००/–रु.,१००/–रु. चे बंडले असे एकुण ५,७४,०००/–रु. मिळुन आले. तसेच फिर्यादी याने ऑफीस बैग व त्या मध्ये असलेले चेक प्रशांत वरठी याचे माध्यमाने जाळल्याचे सांगीतले. करीता सदचा मुददेमाल व फिर्यादी यास पुढील कार्यवाही करीता पो. स्टे खापरखेडा याचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरचा गुन्हा हा मा. पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार मगर, मा. अपर पोलीस अधिक्षक सा श्री माकणीकर, याचे मार्गदर्शनाखाली पो.नि ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण स.पो.नि अनिल राउत, पोहवा विनोद काळे, अरविंद भगत, राजेंद्र रेवतकर, पोना आशिष मुंगळे, उमेश फुलबेल, किशोर वानखेडे, शैलेश यादव, विरेंद्र नरड याचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर